# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** "मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24" राबविण्याबाबत.

**{बाजार विभाग}** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे परिशिष्ट ड प्रकरण 8 चे काराधान नियम क्र. 51 अन्वये मा. आयुक्त आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम 41 खालील शास्ती किंवा नियम 50 खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: किंवा अंशत: माफ करता येईल अशी तरतुद आहे.

1. परवानेधारकांना सुचना देण्यात येते की, अभय योजना (Amnesty Scheme) राबविण्याकरीता जे परवानेधारक दि. 01.01.2024 ते दि. 31.03.2024 पर्यंत थकित + चालु वर्षाचा वापर शुल्क एकमुस्त भरण्यास तयार आहे, अशा परवानेधारकांना शास्ती मध्ये 80% सुट देण्यात येईल. तसेच दि. 01.01.2024 ते दि. 31.03.2024 या कालावधी दरम्यान एकुण 4825 परवानेधारकांना सदर्हु योजनेचा लाभ घेता येईल.
2. थकित वापर शुल्क असलेल्या परवानेधारकांना नोटीस तामिल करण्यात येईल व अभय योजनेचा लाभ देण्यात येईल.
3. परवानेधारकांना रोख रक्कम व धनादेशाव्दारे वापर शुल्क एकमुस्त भरण्याची सुविधा देण्यात येईल.
4. तसेच शास्ती मध्ये सुट देण्याची योजना राबविल्यास विभागाचा बरेच वर्षापासुन प्रलंबित असलेला बकाया वसुल होवू शकेल व यामुळे मनपाला आर्थिक लाभ होईल.

| तपशिल | कालावधी | माफी |
|---|---|---|
| दि. 01.01.2024 ते दि. 31.03.2024 पर्यंत असलेल्या दुकान/ओटे/ जागा शास्तीच्या थकित रक्कमेसह चालु आर्थीक वर्ष 2023-24 चा सुदधा रक्कम नागपूर महानगरपालिका निधीत जमा केल्यास | दि. 01.01.2024 ते दि. 31.03.2024 च्या सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत | वापर शुल्क शास्तीच्या एकमुस्त रक्कमेवर 80% माफ |

5. एकुण 4825 परवानेधारकांची डिसेंबर 2023 पर्यंतची शास्ती एकुण रू. 8,35,10,444/- ऐवढी आहे. यावर परवानेधारकांना शास्ती मध्ये 80% सुट देण्यात आल्यास रू. 6,68,08,355/- माफ होईल. उर्वरीत 20% रक्कम रू. 1,67,02,089/- ऐवढी मनपा प्राप्त होईल. (तक्ता नस्तीस टाचण आहे)
6. अभय योजनाव्दारे शास्तीमध्ये 80% सुट दिल्याने मनपाचे बकाया राशी रू. 12,08,78,720/- व चालु राशी रू. 10,67,55,549/- ऐवढी ही सहज प्राप्त होईल.
7. मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24 ची जाहिरात व प्रसिध्दी

मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24 राबविण्यासाठी परवानेधारकांकडुन मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशिलाबाबत पुढील प्रमाणे विविध माध्यमातुन प्रसिध्दी देण्यात येईल.

1. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे तथा वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येईल.
2. महापालिकेच्या संकेत स्थळावर देखील सदर योजनेचा तपशिल देण्यात येईल.
3. सर्व झोन कार्यालयाव्दारे त्यांचे झोन क्षेत्रांतर्गत येणारे बाजार पेठ यांना मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24 सुचना देण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24 राबविण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 15/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 30/12/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त

झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), बाजार विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार "मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24" राबविण्याबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे परिशिष्ट ड प्रकरण 8 चे काराधान नियम क्र. 51 अन्वये मा. आयुक्त आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम 41 खालील शास्ती किंवा नियम 50 खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: किंवा अंशत: माफ करता येईल अशी तरतुद आहे.

1. परवानेधारकांना सुचना देण्यात येते की, अभय योजना (Amnesty Scheme) राबविण्याकरीता जे परवानेधारक दि. 01.01.2024 ते दि. 31.03.2024 पर्यंत थकित + चालु वर्षाचा वापर शुल्क एकमुस्त भरण्यास तयार आहे, अशा परवानेधारकांना शास्ती मध्ये 80% सुट देण्यात येईल. तसेच दि. 01.01.2024 ते दि. 31.03.2024 या कालावधी दरम्यान एकुण 4825 परवानेधारकांना सदर्हु योजनेचा लाभ घेता येईल.
2. थकित वापर शुल्क असलेल्या परवानेधारकांना नोटीस तामिल करण्यात येईल व अभय योजनेचा लाभ देण्यात येईल.
3. परवानेधारकांना रोख रक्कम व धनादेशाव्दारे वापर शुल्क एकमुस्त भरण्याची सुविधा देण्यात येईल.
4. तसेच शास्ती मध्ये सुट देण्याची योजना राबविल्यास विभागाचा बरेच वर्षापासुन प्रलंबित असलेला बकाया वसुल होवू शकेल व यामुळे मनपाला आर्थिक लाभ होईल.

| तपशिल | कालावधी | माफी |
|---|---|---|
| दि. 01.01.2024 ते दि. 31.03.2024 पर्यंत असलेल्या दुकान/ओटे/ जागा शास्तीच्या थकित रक्कमेसह चालु आर्थीक वर्ष 2023-24 चा सुदधा रक्कम नागपूर महानगरपालिका निधीत जमा केल्यास | दि. 01.01.2024 ते दि. 31.03.2024 च्या सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत | वापर शुल्क शास्तीच्या एकमुस्त रक्कमेवर 80% माफ |

5. एकुण 4825 परवानेधारकांची डिसेंबर 2023 पर्यंतची शास्ती एकुण रू. 8,35,10,444/- ऐवढी आहे. यावर परवानेधारकांना शास्ती मध्ये 80% सुट देण्यात आल्यास रू. 6,68,08,355/- माफ होईल. उर्वरीत 20% रक्कम रू. 1,67,02,089/- ऐवढी मनपा प्राप्त होईल. (तक्ता नस्तीस टाचण आहे)
6. अभय योजनाव्दारे शास्तीमध्ये 80% सुट दिल्याने मनपाचे बकाया राशी रू. 12,08,78,720/- व चालु राशी रू. 10,67,55,549/- ऐवढी ही सहज प्राप्त होईल.
7. मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24 ची जाहिरात व प्रसिध्दी

मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24 राबविण्यासाठी परवानेधारकांकडुन मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशिलाबाबत पुढील प्रमाणे विविध माध्यमातुन प्रसिध्दी देण्यात येईल.

1. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे तथा वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येईल.
2. महापालिकेच्या संकेत स्थळावर देखील सदर योजनेचा तपशिल देण्यात येईल.
3. सर्व झोन कार्यालयाव्दारे त्यांचे झोन क्षेत्रांतर्गत येणारे बाजार पेठ यांना मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24 सुचना देण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे मालमत्ता बाजार अभय योजना 2023-24 राबविण्याबाबतच्या मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.